भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-17/10

एफआयडीडी.जीएसएसडी.सीओ.बीसी.क्र.04/09.16.03/2016-17 जुलै 01, 2016

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक,
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम)**

भारतीय रिझर्व बँकेने, भारत सरकारच्या, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (एनयुएलएम) बाबत, म्हणजेच आता "दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम)" हे नवीन नाव देण्यात आलेल्या योजनेबाबत, नियतकालिकतेने बँकांना सूचना/निदेश दिले आहेत. ह्या विषयावरील विद्यमान सूचना बँकांना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी हे महापरिपत्रक देण्यात येत असून, त्यात आरबीआयने, जून 30, 2016 पर्यंत, डीएवायएनयुएलएमवर पूर्वी दिलेल्या सूचना एकत्रित करण्यात आल्या आहेत व त्यांची यादी परिशिष्टामध्ये दिली आहे. हे महापरिपत्रक आरबीआयच्या वेबसाईटवरही (https://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

कृपया पोच द्यावी.

आपली विश्वासु,

(उमा शंकर)
मुख्य महाव्यवस्थापक

---

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, मुंबई 400 001,
टेलिफोन: 022-22601000 फॅक्स: 91-22-22621011/22619048/2610943 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**

**<u>महापरिपत्रक : दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम)</u>**

पार्श्वभूमी

भारत सरकारच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने, विद्यमान स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची (एसजेएसआरवाय) पुनर् रचना करुन, 2013 मध्ये राष्ट्रीय नागरी उपजीविका योजना (एनयुएलएम) सुरु केली. ही एनयुएलएम सप्टेंबर 24, 2013 पासून, सर्व जिल्ह्यांच्या मुख्य कार्यालयांमध्ये (कितीही लोकसंख्या असली तरीही) आणि 1 लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व शहरात अंमलबजावणीखाली होती.

स्वयं रोजगार कार्यक्रम हा एनयुएलएमचा एक घटक असून (घटक 4) त्याद्वारे, शहरी भागातील गरीबांच्या स्वयंसेवा गटांचे (एसएचजी) आणि वैय्यक्तिक व गट-उद्योगांचे विकास करण्यासाठी, कर्जांवरील व्याजात सबसिडी (सहाय्य) देऊन त्यांना वित्तीय सहाय्य देण्यावर लक्ष केंद्रित करेल. एसजेएसआरवायच्या, युएसईपी (नागरी स्वयंरोजगार कार्यक्रम) व युडब्ल्युएसपी (नागरी महिला स्वयं-सेवा कार्यक्रम) ह्या घटकांना भांडवली अर्थ सहाय्य (सबसिडी) देण्याच्या पूर्वीच्या तरतुदीच्या ऐवजी/जागी, आता वैय्यक्तिक उद्योग (एसईपी-आय) गट-उद्योग (एसईपी-जी) आणि स्वयंसेवा गट (एसएचजी) ह्यांना दिलेल्या कर्जांवरील व्याजात सबसिडी दिली जाईल. नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी उपजीविकेच्या संधींमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने, भारत-सरकारच्या गृह व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने (युपीए विभाग) त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. के 14011/2/2012-युपीए/एफटीएस-5196 फेब्रुवारी 19, 2016 अन्वये राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाची व्याप्ती वाढविण्याचे ठरविले आहे. अशी वाढीव व्याप्ती असलेल्या ह्या अभियानाचे नाव '**दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम)**' असे नव्याने ठेवले जाईल.

**<u>स्वयं रोजगार कार्यक्रम (एसईपी) - कार्यकारी मार्गदर्शक तत्वे</u>**

स्वयं रोजगार कार्यक्रम (एसईपी) ह्या डीएवाय-एनयुएलएमच्या घटकाची कार्यकारी मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**(1) प्रस्तावना**

(1.1) हा घटक, व्यक्ती/नागरी क्षेत्रातील गरीबांचे गट ह्यांना त्यांची कौशल्ये, प्रशिक्षण, कल/आवड आणि स्थानिक परिस्थिती ह्यांच्या अनुषंगाने, लाभदायक असे स्वयंरोजगार उद्योग/सूक्ष्म उद्योग स्थापन करण्यासाठी वित्तीय सहाय्य देण्यावर लक्ष केंद्रित करतो. हा घटक, नागरी क्षेत्रातील गरीबांच्या स्वयंसेवा गटांना (एसएचजी), बँकेकडून सुलभतेने कर्ज मिळवून त्यावरील व्याजावर सबसिडी मिळविण्यास सहाय्यही करतो. ह्याशिवाय, हा घटक, आपल्या उपजीविकेसाठी सूक्ष्म उद्योग करणा-या व्यक्ती, एसएचजी सभासद आणि नागरी क्षेत्रातील रस्त्यावर माल विकणारे/फेरीवाले ह्यांना तंत्रज्ञान, विपणन व इतर पूरक सेवा देण्यावरही लक्ष केंद्रित करील. उद्योजकांच्या भांडवली गरजांसाठी त्यांना क्रेडिट कार्डे देण्यासही हा घटक मदत करील.

(1.2) नागरी क्षेत्रातील बेरोजगार व लायकीच्या मानाने कमी दर्जाचा रोजगार करणारांना, लक्षणीय अशी स्थानिक मागणी असलेल्या मालाचे उत्पादन, सेवा व छोटे व्यवसाय उद्योग करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. विशेषतः स्थानिक कौशल्ये व स्थानिक कारागिरीला प्रोत्साहन दिले जावे. उपलब्ध असलेली कौशल्ये, उत्पादांची विपणनशीलता, खर्च व आर्थिक सफलताक्षमता विचारात घेऊन, प्रत्येक नागरी स्थानिक संस्थेने (युएलबी) अशा कार्यकृतींचा/प्रकल्पांचा एक संघ (कॉंपेडियम) तयार करावा.

(1.3) एसईपीखालील महिला लाभार्थींची टक्केवारी 30 टक्क्यांपेक्षा कमी नसावी. एससी व एसटींना होणारा लाभ, त्या शहरातील/नगरातील गरीब लोकांमधील त्यांच्या संख्येच्या प्रमाणात असावेत. ह्या कार्यक्रमात, वेगळ्या प्रकारची क्षमता असलेल्यांसाठी 3 टक्के एवढे विशेष आरक्षण ठेवले जावे. अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठीच्या प्रधानमंत्र्यांच्या 15 कलमी कार्यक्रमाचा विचार करता, ह्या घटकाखालील किमान 15 टक्के उद्दिष्टे ही केवळ अल्पसंख्याकांसाठीच ठेवलेली असावीत.

**(2) लाभार्थींची निवड**

स्थानिक संस्थेमधील जमात नियोजक (सीओ), नागरी क्षेत्रातील भावी लाभार्थी ओळखतील/ठरवतील. डीएवाय-एनयुएलएमच्या, सामाजिक एकत्रीकरण व संस्थात्मक विकास (एसएम अँड आयडी) घटकाखाली तयार करण्यात आलेल्या जाती-जमातीच्या रचना, युलएलबीच्या एसईपी खालील वित्तीय सहाय्य घेण्यासाठी, भावी वैय्यक्तिक उद्योजक तसेच भावी गट-उद्योजकांचा संदर्भ घेऊ शकतात. लाभार्थी, अर्थसहाय्यासाठी युएलबी किंवा तिच्या प्रतिनिधींकडे

थेट जाऊ शकतात.  बँकांनीही, त्यांच्या बाजूकडील भावी लाभार्थी ओळखून अशी प्रकरणे थेट युएलबीकडे पाठवावीत.

**(3) शैक्षणिक अर्हता व प्रशिक्षण आवश्यकता**

ह्या घटकाखालील भावी लाभार्थींसाठी कोणतीही किमान शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक नाही. तथापि, सूक्ष्म-उद्योग-विकासासाठीच्या ओळखण्यात आलेल्या कार्यकृतीसाठी काही विशेष कौशल्ये आवश्यक असल्यास, **घटक 3 : कौशल्य प्रशिक्षण व नेमणुक (ईएसटी अँड पी)** ह्या घटकाखाली प्रशिक्षणाची जोडणी करुन, वित्तीय मदत देण्यापूर्वी, लाभार्थींना सुयोग्य प्रशिक्षण दिले जावे. प्रायोजित सूक्ष्म-उद्योग चालविण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त केल्यानंतरच वित्त सहाय्य दिले जावे.

(3.1) लाभार्थीने, एखादी ज्ञात संस्था, पंजीकृत एनजीओ/स्वैच्छिक किंवा स्वयंसेवी संस्था ह्यामधून किंवा एखाद्या सरकारी योजनेखाली प्रशिक्षण घेतले असल्यास, असे वेगळे प्रशिक्षण आवश्यक नसावे.  मात्र त्यासाठी आवश्यक असे प्रमाणपत्र प्राप्त केले असले पाहिजे.  कुटुंबातील व्यवसायामधून लाभार्थीने आवश्यक ती कौशल्ये प्राप्त केलेली असल्यास, अशा प्रकरणात, वित्तीय सहाय्य देण्यापूर्वी युएलबीद्वारा प्रमाणपत्र मिळाले असणे आवश्यक आहे.

(3.2) **उद्योजकता विकास कार्यक्रम (ईडीपी) :** लाभार्थींच्या कौशल्य प्रशिक्षणाच्या व्यतिरिक्त, युएलबीद्वारा, वैय्यक्तिक व गट उद्योजकांसाठी, 3 ते 7 दिवसांचा उद्योजकता विकास कार्यक्रम प्रायोजित केला जाईल.  ह्या कार्यक्रमात ईडीपीद्वारे उद्योजकता विकासाची पायाभूत तत्वे, जसे, उद्योगाचे व्यवस्थापन, पायाभूत लेखा कर्म, वित्तीय व्यवस्थापन, विपणन, मागील व पुढील जोडण्या, कायदेशीर कार्यकृती, खर्च (कॉस्टिंग) व महसुल इत्यादींचा समावेश केला जाईल.  वरील विषयांव्यतिरिक्त, गट उद्योजकांसाठी, ग्रुप डायनॅमिक्स, कामांची वाटणी, नफा-वाटप यंत्रणा इत्यादी बाबीही ह्या मॉड्युलमध्ये असाव्यात.

(3.3) हे ईडीपी मॉड्युल, राज्य नागरी उपजीविका अभियान (एसयुएलएम) द्वारे, राज्य अभियान व्यवस्थापन एककाच्या (एसएमएमयु) च्या आधाराने आणि एखादी मंडळाधिष्ठित संस्था/एजन्सी किंवा सल्लागार संस्थेंच्या सहाय्याने विकसित करुन निश्चित केले जावे आणि प्रशिक्षण कार्यक्रमासाठी युएलबीद्वारे त्याचाच उपयोग केला जावा.  हे ईडीपी प्रशिक्षण, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (आरएसईटीआय), उद्योजकता विकास/प्रशिक्षण देणा-या नावाजलेल्या संस्था,

व्यवस्थापन/शैक्षणिक संस्था, उद्योजकता/प्रशिक्षण ह्यामधील नामांकित एनजीओ इत्यादींमार्फत आयोजित केले जावे.

(3.4) ह्या घटकाखालील लाभार्थींच्या प्रशिक्षणाचा खर्च, ईएसटी अँड पी ह्या घटकाच्या अंदाजपत्रकातून मागविला जावा.

**(4) वित्तीय सहाय्याचा साचा**

नागरी क्षेत्रातील गरीबांद्वारे वैय्यक्तिक व गटाने केलेले उद्योग स्थापन करण्यासाठी त्यांना उपलब्ध असलेले वित्तीय सहाय्य, बँक कर्जांवरील व्याजावरील सबसिडीच्या स्वरुपात असेल. वैय्यक्तिक उद्योग किंवा गट उद्योग स्थापन करण्यासाठी 7% व्याजदरावरील बँक कर्जावर व्याज-सबसिडी उपलब्ध असेल. दरसाल 7% आणि विद्यमान व्याजदर ह्यामधील फरक, डीएवाय-एनयुएलएम खाली बँकांना दिला जाईल. कर्जाची परतफेड वेळेवारी केली गेल्यासच व्याज सबसिडी दिली जाईल. ह्याबाबत बँकांकडून सुयोग्य प्रमाणपत्रे घेतली जातील.

**(5) व्याज सबसिडीसाठी कार्यरीत**

(5.1) ह्या योजनेखाली, व्याज-अर्थसहाय्य मिळण्यासाठी, कोअर बँकिंग सोल्युशन्स (सीबीएस) चा मंच असलेल्या सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (एससीबी), प्रादेशिक ग्रामीण बँका (आरआरबी) आणि सहकारी बँका पात्र असतील.

(5.2) लाभार्थींना कर्ज वाटप केल्यानंतर, त्या बँकेची संबंधित शाखा, कर्ज वाटप केल्याची प्रकरणे आणि व्याज-सबसिडीच्या रकमेचा तपशील युएलबीकडे पाठवितील.

(5.3) बँकांद्वारे केल्या गेलेल्या दाव्यांची तडजोड, युएलबीद्वारे तिमाही धर्तीवर केली जाईल. तथापि हे दावे दरमहा सादर केले जावेत. युएलबी, त्यांना मिळालेली माहिती तपासून पाहतील आणि त्यानुसार व्याज-सबसिडीची रक्कम (द.सा. 7% व विद्यमान व्याजदर ह्यामधील फरक) बँकांना पाठवितील.

(5.4) ह्या घटकाखालील कर्जांसाठीच्या व्याज-सबसिडी दाव्यांसाठीचा विहित नमुना सोबत जोडला आहे (**जोडपत्र 1**).

(5.5) राज्य स्तरीय बँकर्स समित्या (एसएलबीसी), राज्य सरकारच्या सल्ल्याने दाव्यांचे एकत्रीकरण/मंजुरी करण्यासाठी पर्यायी कार्यरीत तयार करु शकतात.

(5.6) तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ दावे प्रलंबित ठेवले जाऊ नयेत. बँकांचे दावे 6 महिन्यांपर्यंत समायोजित न केले गेल्यास, निवडक शहरांमध्ये ही योजना तात्पुरती बंद करण्याचा अधिकार एसएलबीसीला आहे. मात्र अशा युएलबींनी दावे निकालात काढलेले असावेत. अशा प्रसंगी दाव्यांची तडजोड करण्याचे काम लीड डिस्ट्रिक्ट बँकेला देण्यात यावे.

**(6) पोट-घटक 4.1 - व्यक्तिगत उद्योग - (एसईपी-1) - कर्ज व सबसिडी**

(6.1) स्वयंरोजगारासाठी, वैय्यक्तिक सूक्ष्म उद्योग स्थापन करण्यास इच्छुक अशी नागरी क्षेत्रातील गरीब व्यक्ती, ह्या घटकाखाली, कोणत्याही बँकेकडून सबसिडाइज्ड कर्ज प्राप्त करु शकते. वैय्यक्तिक सूक्ष्म उद्योग कर्जासाठीचे निकष/गुणविशेष पुढीलप्रमाणे आहेत.

(6.2) **वय :** भावी लाभार्थींचे कर्जासाठी अर्ज करतेवेळीचे वय 18 वर्षे असावे.

(6.3) **प्रकल्प खर्च (पीसी)** : वैय्यक्तिक सूक्ष्म उद्योगासाठी कमाल एकक प्रकल्प खर्च रु.2,00,000/- (रु. दोन लाख) आहे.

(6.4) **बँक कर्जासाठी तारण :** कोणतेही तारण असणे आवश्यक नाही. आरबीआयचे परिपत्रक आरपीसीडी.एसएमई अँड एनएफएस.बीसी.क्र.79/06.02.31/2009-10 दिनांक मे 6, 2010 अन्वये, एमएसई क्षेत्रातील एककांना रु.10 लाखांपर्यंत दिलेल्या कर्जांसाठी कोणतेही तारण प्रतिभूती/सुरक्षा न स्वीकारणे बँकांसाठी अपरिहार्य करण्यात आले आहे. ह्यासाठी, कर्ज देण्यासाठी, केवळ त्यामुळे निर्माण झालेले ॲसेट्स बँकांकडे तारण/गहाण/प्लेज करण्यात येतील. हमी-संरक्षणासाठी त्या कार्यकृतीबाबत असलेल्या पात्रतेनुसार, एसईपी कर्जांसाठी हमी संरक्षण मिळविण्यासाठी, बँका, स्मॉल इंडस्ट्रीज डेवलपमेंट बँकेने (एसआयडीबीआय) स्थापन केलेल्या, सूक्ष्म व लघु उद्योगांसाठीच्या क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्टकडे (सीजीटीएमएसई) जाऊ शकतात.

(6.5) **परतफेड :** बँकांनी त्यांच्या निकषानुसार ठरविलेल्या 6 ते 18 महिन्यांच्या सुरुवातीच्या मोराटोरियम नंतर (कर्ज पुढे ढकलण्याचा अधिकार) 5 ते 7 वर्षांपर्यंत परतफेडीचे वेळापत्रक करता येते.

(6.6) **मार्जिन मनी :** रु.50,000/- पर्यंतच्या कर्जांसाठी कोणतेही मार्जिन मनी घेतले जाऊ नये आणि रु.50,000/- ते रु.10 लाखांपर्यंतच्या कर्जांसाठी, शक्यतो 5% मार्जिन मनी घेण्यात यावा आणि कोणत्याही परिस्थितीत तो प्रकल्प खर्चाच्या 10% पेक्षा जास्त असू नये.

(6.7)**कर्ज सुविधेचा प्रकार:** मुदत कर्जे आणि कॅश क्रेडिट मार्फत दिलेली कार्यकारी भांडवली कर्जे ह्यांच्या स्वरुपात, भांडवली खर्चासाठी, बँका, व्यक्तींना वित्तसहाय्य देउ शकतात. व्यक्तीगत गरजेनुसार, भांडवली खर्च व कार्यकारी भांडवल असे घटक असलेली संयुक्त कर्जेही बँका देउ शकतात.

**(7) पोट-घटक 4:2 : गट-उद्योग (एसईपी-जी) - कर्ज व सबसिडी**

एखादा स्वयंसेवा गट (एसएचजी) किंवा डीएवाय - एनयुएलएम खाली स्थापन केलेल्या एखाद्या एसएचजी गटाचे सभासद किंवा नागरी क्षेत्रातील गरीबांनी स्वयंरोजगारासाठी स्थापन केलेला गट. ह्या पोट घटकाखाली, कोणत्याही बँकेकडून अशा सबसिडीयुक्त कर्जाचा लाभ घेऊ शकतात. गट-सूक्ष्म उद्योग कर्जांसाठी असलेले निकष/गुणविशेष पुढीलप्रमाणे आहेत.

(7.1) **पात्रतेच्या अटी :** अशा गटात किमान 5 सभासद असावेत व त्यातील 70% सभासद हे नागरी क्षेत्रातील गरीब कुटुंबांमधील असावेत. एकाच/त्याच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्ती त्याच गटामध्ये असू नयेत.

(7.2) **वय :** बँकेकडे कर्जासाठी अर्ज करतेवेळी, त्या गट-उद्योगातील सर्व सभासदांचे वय 18 वर्षे असावे.

(7.3) **प्रकल्प खर्च (पीसी)** : त्या उद्योगाबाबत गट-वित्तसहाय्यासाठी, कमाल एकक प्रकल्प खर्च रु.10,00,000/- (रु. दहा लाख) एवढा आहे.

(7.4.1) **कर्जाचा प्रकार :** हे कर्ज, केवळ एकच कर्जदार एकक म्हणून असलेल्या गटाला दिलेले एकच कर्ज असेल किंवा परस्पर विश्वास व त्या गटातील तारण पर्याय ह्यांच्या आधारावर, गटातील प्रत्येक सभासदाला वैय्यक्तिक कर्ज म्हणून दिले जाईल. एखाद्या गटाला कर्ज देतेवेळी, ते अंदाजपत्रक (2014-15) घोषणा - भूमिहीन किसानांच्या संयुक्त शेती गटांना वित्तसहाय्य देणे ह्या विषयावर, आरबीआयने 13 नोव्हेंबर, 2014 रोजी दिलेल्या तत्वांचे आणि त्यात केलेल्या सुधारणांचे करणे आवश्यक आहे.

(7.4.2) **कर्ज सुविधेचा प्रकार :** मुदत कर्ज आणि कार्यकारी भांडवल ह्या स्वरुपात, भांडवली खर्चासाठी, अशा गटांना बँका, कॅश क्रेडिट सुविधेमार्फत वित्तसहाय्य करु शकतात. त्या गटाच्या गरजेनुसार, भांडवली खर्च व कार्यकारी भांडवल ह्यासाठी बँका संयुक्त कर्जेही देऊ शकतात.

(7.4.3) **कर्ज व मार्जिन मनी :** प्रकल्प खर्च वजा त्या लाभार्थीने जमा केलेली/दिलेली रक्कम (मार्जिन मनी) एवढी रक्कम कर्ज म्हणून बँकेद्वारे गट उद्योगाला उपलब्ध केली जाऊ शकते. रु.50,000/- पर्यंतच्या कर्जासाठी कोणताही मार्जिन मनी घेतला जाऊ नये आणि त्यापेक्षा अधिक कर्ज रकमेसाठी शक्यतो 5% मार्जिन मनी घेतला जावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत तो प्रकल्प खर्चाच्या 10% पेक्षा अधिक असू नये.

(7.5) **बँकेच्या कर्जावरील तारण-हमी** : कोणत्याही प्रकारचे तारण/हमी आवश्यक नाही. कर्जे देण्यासाठी केवळ निर्माण झालेले ॲसेट्स गहाण/तारण/प्लेज केले जातील. परिच्छेद 6.4 मध्ये दिल्यानुसार बँका, क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो अँड स्मॉल एंटरप्रायजेसकडे (सीजीटीएमएसई) जाऊ शकतात.

(7.6) **परतफेड :** बँकांनी त्यांच्या निकषानुसार ठरविलेल्या 6 ते 18 महिन्यांच्या सुरुवातीच्या मोराटोरियम नंतर (कर्ज पुढे ढकलण्याचा अधिकार) 5 ते 7 वर्षांपर्यंत परतफेडीचे वेळापत्रक करता येते.

(8) **अर्ज प्रायोजित करण्याची कार्यरीत**

(8.1) वैय्यक्तिक तसेच गट-उद्योगांसाठीच्या कर्जाचे अर्ज, नागरी स्थानिक संस्थेमार्फत (युएलबी) प्रायोजित केले जातील. ही संस्था, वैय्यक्तिक व गट उद्योगांसाठीची प्रायोजक एजन्सी असेल.

(8.2) ही युएलबी, निरनिराळ्या सार्वजनिक वाहिन्या मोहिमा, आयईसी कार्यकृती, स्थानिक वृत्तपत्रातील जाहिराती, शहर उपजीविका केंद्रे (सीएलसी) इत्यादीं मार्फत, भावी लाभार्थींमध्ये एसईपी संबंधाने जाणीव निर्माण करील. रिसोर्स ऑर्गनायझेशन्स व त्यामधील फील्ड स्टाफ ह्यांच्या सक्रिय सहयोगामधून, ही युएलबी, ह्या घटकाबाबतची माहिती प्रसारित करु शकते.

(8.3) स्वतःचा उद्योग स्थापन करण्यास इच्छुक असलेले लाभार्थी, एका साध्या कागदावर, मूलभूत माहिती देऊन (म्हणजे नाव, वय, संपर्क माहिती, पत्ता, आधार कार्ड (असल्यास), कर्जाची रक्कम, बँक खाते क्रमांक (असल्यास) उद्योग/कार्यकृतीचा प्रकार, वर्ग इत्यादि) संबंधित युएलबी अधिका-

यांकडे अर्ज देऊ शकतात.  असा हेतु-अर्ज मेल/पोस्ट द्वाराही युएलबी कार्यालयात पाठवला जाऊ शकतो.  असे हेतु-अर्ज युएलबीद्वारे संपूर्ण वर्षभर स्वीकारले जातील.

(8.4) सोशल मोबिलायझेशन अँड इंस्टिट्युशनल डेवलपमेंट (एसएम अँड आयडी) ह्या, डीएवाय-एनयुएलएमच्या घटकाखाली स्थापन झालेल्या जमात-रचनाही, (उदा. स्वयंसेवा गट/एसएचजी/क्षेत्र स्तरीय संघ (एएलएफ) भावी वैय्यक्तिक व गट-उद्योजकांना, एसईची खालील वित्त सहाय्यासाठी युएलबीकडे संदर्भित करु शकतात.

(8.5) लाभार्थींकडून असा हेतु-अर्ज सादर केल्यावर/मिळाल्यावर, संबंधित युएलबी, तो तपशील एका रजिस्टरमध्ये/उपलब्ध असल्यास एमआयएसमध्ये नोंदवून ठेवील आणि एक लाभार्थींची एक प्रतीक्षा यादी तयार करील.  युएलबी लाभार्थीला एका एकमेव पंजीकरण क्रमांकासह पोच देईल आणि हा क्रमांक, अर्जाची स्थिती जाणून घेण्यास संदर्भ क्रमांक म्हणून वापरला जाईल.

(8.6) बँकादेखील, पात्रता निकषांनुसार लाभार्थी ठरवून हेतु-पत्र स्वीकारु शकतील.  बँकांकडे थेट आलेले अर्ज युएलबीकडे संदर्भित केले जातील.  अशा रितीने आलेले अर्जही प्रतीक्षा यादीत समाविष्ट केले जातील.

(8.7) प्रतीक्षा यादीमधील क्रमानुसार, युएलबी, लाभार्थींना, आवश्यक ते कागदपत्र पूर्ण करण्यासाठी कर्जासाठीचा अर्ज (एलएएफ) फॉर्म भरणे, कार्यकृतीचा तपशील, ओळखीचा पुरावा, पत्त्याचा पुरावा, बँक खाते तपशील इत्यादींसह) बोलवील.  राज्यस्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी), आमंत्रक बँक ह्यांच्याशी सल्लामसलत करुन एसयुएलएम, सुयोग्य नमुन्यातील एक कर्ज-अर्जाचा फॉर्म (एलएएफ) विकसित करु शकते.  हाच एलएएफ त्या संपूर्ण राज्यात वापरला जाऊ शकतो.

(8.8) सर्व बाबतीत पूर्ण असलेले अर्ज छाननी करण्यासाठी, युएलबी स्तरावतील कृतीदलाकडे पाठविले जातील.  आणि हे कृतीदल, अर्जाची शिफारस करण्यापूर्वी किंवा फेटाळण्यापूर्वी लाभार्थींना मुलाखतीसाठी बोलावतील किंवा आवश्यक असल्यास अर्जदाराकडून अतिरिक्त माहिती मागवील.

(8.9) ह्या कृतीदलाने शिफारस केलेले प्रकरण/बाब/अर्ज, पुढील प्रक्रिया करण्यासाठी युएलबीद्वारे संबंधित बँकेकडे पाठविले जातील.  कृतीदलाने शिफारस केलेल्या प्रकरणांवर, संबंधित बँकांद्वारे 15 दिवसांच्या आत प्रक्रिया केली जाणे आवश्यक आहे.  ह्या प्रकरणांची शिफारस कृतीदलाने आधीच केली असल्याने अशी प्रकरणे बँकांनी केवळ अपवादात्मक परिस्थितीतच फेटाळावीत.

(8.10) मिळालेल्या अर्जाच्या स्थितीवरील अहवाल, बँका, नियतकालिकतेने युलएलबीकडे पाठवतील. एमआयएसचा उपयोग केला गेला असल्यास, लेखी अहवालाच्या अतिरिक्त, ह्या अर्जाबाबतची स्थिती ऑनलाईन अद्यावत करण्यास बँकांना परवानगी आहे.

**(9) युएलबी स्तरावरील कृतीदल**

(9.1) युएलबीद्वारे, वैय्यक्तिक व गट-उद्योगांची प्रकरणे शिफारस करुन पुढे पाठविण्यासाठी, युएलबी स्तरावर एक कृतीदल स्थापन केले जावे. असे कृतीदल स्थापन करण्याची जबाबदारी, युएलबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)/म्युनिसिपल कमिशनर ह्यांची असेल आणि तेच ह्या कृतीदलाचे अध्यक्ष असतील. युएलबीचे आकारमान/लोकसंख्या ह्यावर अवलंबून, युएलबी स्तरावर एकापेक्षा अधिक कृतीदले असू शकतील. अशा कृतीदलाची निर्देशक रचना पुढीलप्रमाणे असेल.

| अनुक्रमांक. | **युएलबी स्तरावरील कृतीदल** | भूमिका |
|---|---|---|
| 1. | युएलबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)/युएलबीचे म्युनिसिपल कमिशनर/किंवा युएलबीच्या सीईओने प्राधिकृत केलेला कोणताही प्रतिनिधी. | अध्यक्ष |
| 2. | लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर (एलडीएम) | सभासद |
| 3. | युएलबीचा नगर प्रकल्प अधिकारी (सीपीओ)/किंवा युएलबीने प्राधिकृत केलेला कोणताही प्रतिनिधी | आमंत्रित सभासद |
| 4. | जिल्हा उद्योग केंद्रामधील (डीआयसी) प्रतिनिधी. | सभासद |
| 5. | बँकांचे वरिष्ठ शाखा निबंधक (कमाल 2) | सभासद |
| 6. | क्षेत्र स्तरीय संघाचे/शहर स्तरीय संघाचे प्रतिनिधी(2) | सभासद |

(9.2) युएलबी, आलेले अर्ज कृतीदलाकडे पाठवील आणि अनुभव, कौशल्ये, कार्यकृतीची सफलक्षमता, कार्यकृतीची व्याप्ती इत्यादींच्या आधारावर ह्या अर्जांची छाननी केली जाईल. त्यानंतर कृतीदल हे अर्ज शॉर्ट लिस्ट करील आणि अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावतील.

(9.3) त्यानंतर कृतीदल ते अर्ज सुयोग्य आढळल्यास त्यांची शिफारस करील. अयोग्य आढळल्यास फेटाळून लावील किंवा प्रकरणानुसार अधिक आवश्यक माहिती सादर करण्यास लाभार्थीला सांगेल.

**(10) सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्रालयाच्या कर्ज हमी योजनेशी (सीजीएस) जोडणी**

लघु उद्योग विकास बँक (एसआयडीबीआय) व भारत सरकार ह्यांनी, एसईपी कर्जांसाठीचे हमी संरक्षण मिळविण्यासाठी (हमी संरक्षणासाठी पात्र असलेल्या कार्यकृतीनुसार) स्थापन केलेल्या, सूक्ष्म व लघु उद्योगासाठीच्या कर्ज हमी निधी न्यासाकडे (सीजीटीएमएसई) बँका जाऊ शकतात.

**(11) एसईपी-आय व युसईपी-जी साठी प्रगती अहवाल पाठविणे**

(11.1) कृतीदलाने शिफारस केलेल्या अर्जाचे एक माहितीपत्रक, त्या अर्जांच्या मंजुरी, वाटप व फेटाळणी (कारणांसह) ह्यांच्या स्थितीसह, संबंधित बँकेकडून पडताळणी करुन युएलबी तयार करील. हे माहितीपत्रक एमयुएलएमकडे मासिक धर्तीवर पाठविण्यात येईल.

(11.2) संबंधित युएलबींकडून मिळालेले सर्व अहवाल एसयुएलएम पूर्ण करील, आणि एम/ओ एचयुपीएला मासिक धर्तीवर कळवील.

(11.3) एसयुएलएमने खात्री करुन घ्यावी की, एसएलबीसीच्या व जिल्हा सल्लागार समितीच्या (डीसीसी) प्रत्येक सभेमध्ये, एसईपीखाली झालेल्या प्रगतीचे पुनरावलोकन केले जात आहे. एसईपीबाबतचे इतर कोणतेही प्रश्न, परिणामकारक समन्वय साधण्यासाठी व अंमलबजावणी करण्यासाठी, एसयुएलएमने, एसएलपीबीच्या आमंत्रक बँकेसमोर उपस्थित करावेत.

**(12) पोट-घटक 4.3 - एसएचजी कर्जांवरील (एसएचजी-बँक जोडणी) व्याज सबसिडी**

(12.1) एसएचजीच्या बँकेबरोबर करावयाच्या जोडणीवर, रिझर्व बँकेच्या नाणेविषयक धोरणात व वेळोवेळी घोषित केलेल्या केंद्रीय अंदाजपत्रकातही जोर देण्यात आला आहे आणि भारतीय रिझर्व

बँकेने (आरबीआय) ह्याबाबत निरनिराळी मार्गदर्शक तत्वे बँकांना दिली आहेत. एसएचजी जोडणी कार्यक्रम वाढविण्यासाठी व तो टिकवून ठेवण्यासाठी, बँकांनी, त्यांच्या मुख्य कर्ज कार्यकृतींचा एक भाग म्हणून (धोरण व अंमलबजावणी ह्या दोन्हीही स्तरांवर, एसएचजींना कर्ज देण्याचा विचार करावा.

(12.2) रिझर्व बँकेने दिलेल्या, एसएचजी-बँक जोडणी कार्यक्रमावर दिलेल्या महापरिपत्रकात, एसएचजी-बँक जोडणीसाठी सूचना समाविष्ट केलेल्या आहेत. त्यामध्ये, सुरुवात म्हणून, एसएचजी गटामधील सभासदांमध्ये बचत करण्याची सवय वाढविण्यात कार्यरत असलेल्या स्वयं सेवा गटांचा (नोंदणीकृत असलेले किंवा नोंदणीकृत नसलेले) बचत बँक खाते उघडण्याचा समावेश आहे. त्यानंतर, योग्य ते मूल्यमापन करुन किंवा दर्जा ठरवून त्या एसएचजींना बचत-जोडणी युक्त कर्जे (बचत-कर्ज गुणोत्तर 1.1 ते 1.4 अशी कर्जे बँकांद्वारे दिली जाऊ शकतात. तथापि; परिपक्व झालेल्या एसएचजींच्या बाबतीत, बँकेला तसे वाटल्यास, बचतीच्या चौपट ह्या मर्यादेपलिकडेही कर्जे दिली जाऊ शकतात. बँकांना असेही सांगण्यात आले आहे की, दुर्बल घटकांना कर्ज देण्याचा एक भाग म्हणून बँकांनी, एसएचजीच्या सभासदांनी कोणत्याही हेतूसाठी कर्ज मागितले असल्यास त्यांना अग्रिम राशी देणे समाविष्ट करावे.

(12.3) डीएवाय-एनयुएलएमच्या सोशल मोबिलायझेशन अँड इंस्टिट्युशन डेवलपमेंट (एस एम अँड आयडी) ह्या घटकाखाली, युएलबी, एसएचजींसाठी बँक खाती उघडण्यासाठी व रिवॉल्विंग फंड (आर एफ) मध्ये प्रवेश मिळण्यास मदत होण्यासाठी आवश्यक ते पूर्व कार्य करतील. ह्या कामासाठी युएलबी, रिसोर्स ऑर्गनायझेशनची (आरओ) मदत घेऊ शकतील किंवा त्यांच्या कर्मचा-यांमार्फत थेट एसएचजींना मदत करु शकतील (एसएचजीची संकल्पना व स्थापना, आरओ रिवॉल्विंग फंड ह्याबाबतची सविस्तर माहिती, डीएवाय-एनयुएलएमच्या सोशल मोबिलायझेशन अँड इंस्टिट्युशनल डेवलपमेंट (एस एम अँड आयडी) ह्या घटकामध्ये दिली आहे).

(12.4) नागरी क्षेत्रातील गरीबांना परवडणा-या व्याजदरात कर्ज मिळावे ह्या दृष्टिकोनातून, डीएवाय-एनयुएलएम, बँक कर्ज घेणा-या एसएचजींसाठी व्याज सबसिडी उपलब्ध करुन देईल. ही व्याज-सबसिडी, बँकांद्वारे आकारला जाणारा विद्यमान व्याजदर आणि दरसाल 7 टक्के ह्यामधील फरका एवढा असेल. एसएचजींनी घेतलेल्या कर्जांवरील व्याजामधील फरकाची ही रक्कम (विद्यमान व्याजदर व दरसाल 7% ह्यामधील)बँकांना परत दिली जाईल.

(12.5) वेळेवारी परतफेड करणा-या सर्व पहिला एसएचजींना 3% अतिरिक्त व्याज-सहाय्य दिले जाईल. ह्या व्याज-सबसिडीसाठी, कर्ज फेड वेळेवारी (कर्ज परतफेडीच्या वेळापत्रकानुसार) करण्याची व युएलबीने संबंधित बँकांकडून तसे प्रमाणपत्र मिळविले असल्याची अट आहे. 3% अतिरिक्तव्याज सहाय्याची रक्कम मात्र असलेल्या डब्ल्युएसएचजींना परत केली जाईल व त्यानंतर त्याबाबतचा परतावा/भरपाई मागितली जावी.

(12.6) बँकांकडून कर्ज मिळविण्यासाठी बँका, त्यांच्या कर्मचा-यांमार्फत किंवा रिसोर्स ऑर्गनायझेशन (आरओ) मार्फत, पात्र असलेल्या एसएचजींना कर्जासाठीचे अर्ज भरण्यास मदत करतील. ह्या एसएचजींचे कर्जासाठीचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित बँकांकडे पाठविण्याची जबाबदारी युएलबीची असेल. बँकांना पाठविलेल्या अर्जांबाबत क्षेत्र निहाय, बँक निहाय, आरओ/कर्मचारी निहाय माहिती युएलबी ठेवील आणि ही माहिती मासिक धर्तीवर एसयुएलएमकडे पाठविण्यात येईल.

(12.7) कर्ज वाटप केलेल्या प्रकरणांची व्याज-सबसिडीच्या रकमेच्या गणनासह माहिती, बँका युएलबीकडे पाठवितील. युएलबी ही माहिती तपासेल आणि परिच्छेद 5 मध्ये निर्देश केल्यानुसार कार्यकृतीचे अनुसरण करुन, तिमाही धर्तीवर व्याज-सबसिडी रक्कम पाठवील. अतिरिक्त व्याज सहाय्य मागण्याचा विहित नमुना जोडपत्र 2 मध्ये दिला आहे.

(12.8) डीएवाय-एनयुएलएसखाली परिणामकारक अशी एसएचजी बँक जोडणी होण्याची खात्री करण्यासाठी, एसयुएलएम, ह्या बाबतच्या प्रगतीच्या प्रगतीवर देखरेख ठेवील. त्याबाबत बँकांबरोबर पुनरावलोकन करील आणि राज्यामधील एसएचजी कर्जांवरील व्याज-सबसिडी/सहाय्य ह्याबाबत, एसएलबीसीशी सहकार्य करील. नागरी क्षेत्रातील गरीबांच्या वित्तीय समावेशनासाठी बँक व शाखा ह्यामधील कर्मचा-यांना संवेदनशील करण्यासाठी, राज्य स्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी) आणि लीड बँकांचा सक्रिय सहभाग असल्याची खात्री केली जावी.

(12.9) येथे नोंद घेण्यात यावी की, व्याज-अर्थसहाय्य मिळविणा-या एसएचजींची ओळख, निवड, रचना व देखरेख ही राज्य/युएलबी ह्यांचीच जबाबदारी असेल आणि व्याज-अर्थसहाय्य मिळालेल्या एसएचजींच्या चुकीच्या ओळखीबाबत बँका जबाबदार असणार नाहीत.

(12.10) त्वरित परतफेडीसाठीची आरबीआयची मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) एसएचजींच्या कॅश क्रेडिट मर्यादेसाठी**

(1) शिल्लक येणे रक्कम (आऊटस्टँडिंग बॅलन्स) ही, मंजुर केलेल्या मर्यादेपेक्षा/निकासी मर्यादेच्यापेक्षा सातत्याने 30 दिवसांपेक्षा अधिक असू नये.

(2) खात्यामध्ये नियमित रितीने जमा व निकासी (डेबिट) असावी. कोणत्याही परिस्थितीत, महिन्यामध्ये ग्राहकाद्वारे केलेली किमान एक जमा (क्रेडिट) असावी.

(3) ग्राहकांनी एका महिन्यात क्रेडिट केलेली रक्कम, त्या महिन्यात डेबिट केलेले व्याज भागविण्यास पुरेशी असावी.

(ब) **एसएचजीना दिलेल्या मुदत कर्जासाठी**

कर्जांच्या संपूर्ण मुदतीमध्ये, व्याजाची सर्व प्रदाने आणि/किंवा मुद्दलाचे हप्ते ठरविलेल्या तारखेच्या 30 दिवसांच्या आत भरले गेले असल्यास ते मुदत कर्ज खाते त्वरित प्रदान करणारे समजले जाते.

त्वरित प्रदानाबाबतची मार्गदर्शक तत्वे, आरबीआयद्वारा ह्या विषयावर भविष्यात दिल्या जाणा-या मार्गदर्शक तत्वांनुसार असणे सुरुच राहील.

**(13) पोट घटक 4.4 - उद्योग/व्यवसाय विकासासाठी क्रेडिट कार्ड**

(13.1) डीएवाय-एनयुएलएम खाली, उद्योग स्थापन करण्यासाठी सबसिडाइज केलेल्या कर्जाद्वारे व्यक्तिगत उद्योजकांना वित्तीय सहाय्य देणे, हे नागरी क्षेत्रातील गरीबांना उपजीविकेचे साधन मिळण्यासाठी सुरुवातीचे उत्तेजन समजले जाऊ शकते. तथापि, तो उद्योग आर्थिक दृष्ट्या टिकून राहण्यासाठी अशा उद्योजकांना कार्यकारी भांडवलाच्या स्वरुपात अधिक वित्तसहाय्याची गरज भासते. ह्यात, मालाची खरेदी, कच्चा माल आणि इतर खर्च भागविण्यासाठी, ताबडतोब व लघु मुदतीची मासिक रोख रकमेची गरज समाविष्ट आहे. उद्योजकतेमधील कार्यकृतींमुळे निर्माण होणारे खर्च भागविण्यासाठी अशा सूक्ष्म उद्योजकांकडे नियमित अशी स्थिर मासिक रोकड आवक/उत्पन्न नसते. अशा तातडीने आवश्यक असलेल्या कर्जासाठी एखाद्या वित्तीय संस्थेकडे जाण्यासाठी, रीतसर कागदपत्रे लागतात आणि त्यात वेळही खूप जातो. कार्यकारी भांडवलासाठीच्या कर्जाची गरज सर्वसाधारणतः अनौपचारिक स्त्रोतांद्वारे (ह्यात सावकार समाविष्ट आहेत) भागविली जाते व ते कर्ज अधिक व्याजदरानेच उपलब्ध असते.

(13.2) सूक्ष्म-उद्योजकांना त्यांचे कार्यकारी भांडवल व फुटकळ खर्च ह्यासाठी सहाय्य करण्यासाठी, डीएवाय-एनयुएलएम बँकांद्वारे क्रेडिट कार्डे देऊ करेल.

(13.3) राज्य स्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी) बरोबर सल्लामसलत करुन, एसयुएलएम, व्यक्तिगत उद्योजकांना क्रेडिट कार्डे देण्यासाठीचे निकष, मर्यादा व गुणविशेष निश्चित करील. सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांनी अंमलबजावणीत आणलेली जनरल क्रेडिट कार्ड योजना (जीसीसी) किंवा नागरी क्षेत्रातील बँकांची उद्योजकता विकासासाठीची निरनिराळी क्रेडिट कार्डे ह्यांचे सहाय्य, एसयुएलएम व एसएलबीसी ह्यासाठी घेऊ शकतात. सुधारित जीसीसी योजनेवरील परिपत्रक आरबीआयची अधिसूचना आरपीसीडी.एमएसएमई अँड एनएफएस.बीसी.क्र.61/06.02.31/2013-14 दि. डिसेंबर 2, 2013 देण्यात आले असून ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

(13.4) भावी लाभार्थींना ओळखून, युएलबी क्रेडिट कार्डे देण्यासाठी बँकांबरोबर जोडण्या करील. ह्यातील मुख्य उद्दिष्ट म्हणजे, एसईपीखाली वित्तसहाय्य मिळविलेल्या सर्व लाभार्थींना क्रेडिट कार्डे देणे. ह्याशिवाय, स्वतःचेच उद्योग चालविणारे परंतु एसईपीखालील सहाय्य न घेतलेले इतर लाभार्थीही, क्रेडिट कार्ड देण्याबाबतचे निकष पूर्ण करत असल्यास ह्यात समाविष्ट केले जाऊ शकतील.

(13.5) ह्यासाठीची उद्दिष्टे युएलपी स्तरावर निश्चित केली जावीत आणि ह्या घटकाखालील प्रगती, एसयुएलएम स्तरावर एकत्रित करुन ती एमओएचयुपीए ह्यांना नियतकालिकतेने कळविली जावी.

**(14) पोट घटक - 4.5 - तंत्रज्ञान, विपणन व इतर सहाय्य**

आपल्या उद्योगाची वाढ होण्यासाठी व टिकून राहण्यासाठी सूक्ष्म-उद्योजकांना नेहमीच आधाराची गरज असते. असा आधार, आस्थापना, तंत्रज्ञान, विपणन व इतर सेवांसाठी आवश्यक असू शकतो. अत्यंत छोटे उद्योग/व्यवसाय करणारांना, मार्केट मध्ये काय गरज आहे, त्यांनी उत्पादन केलेल्या उत्पादांची मागणी, किंमती, माल कुठे विकायचा इत्यादींचे ज्ञान/जाणीव असणे आवश्यक आहे. ह्या घटकाखालील आधारभूत सेवा, सूक्ष्म उद्योगांच्या विकासासाठी उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी ठेवल्या आहेत.

(14.2) डीएवाय-एनयुएलएम खाली स्थापन झालेली शहर उपजीविका केंद्रे (सीएलसी), सूक्ष्म-उद्योग टिकून राहण्यासाठी त्यांना, आस्थापना (परवाने, प्रमाणपत्रे, पंजीकरण, कायदे इत्यादी) उत्पादन, मालाची खरेदी, तंत्रज्ञान, प्रक्रिया, विपणन, विक्री, पॅकेजिंग, लेखा इत्यादींमध्ये सेवा देऊ करतील. ह्या सूक्ष्म-उद्योगांचे उत्पाद व सेवांसाठी, सीएलसी, बाजारातील मागणी व बाजारातील डावपेच/कृतीयोजना ह्यावरील सफलक्षमता/मूल्यमापन ह्याबाबतही मदत करतील.

(14.3) एसईपीच्या सर्व व्यक्तीगत व गटाने असलेले गट उद्योगांना, सीएलसीच्या निकषांनुसार त्यांच्या सेवा उपलब्ध असतील. युएलबीच्या मदतीने, सीएलसी, भावी लाभार्थींच्या लाभासाठी व सूक्ष्म उद्योगांच्या विकासासाठी, सेवा व लाभ देऊ करणा-या निरनिराळ्या सरकारी योजनांशी जोडणीही करुन देतील.

(14.4) सीएलसींना वरील सेवा देण्यासाठी, एसयुएलएम अतिरिक्त निधीची/व्यावसायिक सहाय्याची व्यवस्था करु शकतात.

**(15) निधी पुरवठ्याचा साचा**

(15.1) ह्या घटकाखालील निधी पुरवठा, केंद्र व राज्ये ह्यामध्ये 75:25 ह्या प्रमाणात वाटून घेतला जाईल. विशेष वर्गातील राज्यांबाबत (अरुणाचल प्रदेश, आसाम, मणीपुर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, जम्मु व काश्मिर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड) हे केंद्र व राज्यांमधील गुणोत्तर 90:10 असेल.

(15.2) राज्यांना दिलेल्या उद्दिष्टांवर आधारित, हे मंत्रालय, वार्षिक धर्तीवर निधी वाटप करील. संबंधित एसएलबीसी व युएलबींशी सल्लामसलत करुन, ही राज्ये उद्दिष्टे निश्चित करतील आणि त्यानुसार असलेला निधी युएलबींना अशा रितीने देण्यात येईल की, व्याज-सहाय्याच्या संपूर्ण रकमेची बँकांना द्यावयाची भरपाई त्याच आर्थिक वर्षात समायोजित केली जाईल आणि राज्यांच्या बाबतीत, व्याज सहाय्याची रक्कम मुदतबाह्य किंवा प्रलंबित राहणार नाही.

**(16) देखरेख व मूल्यमापन**

(16.1) राज्यस्तरीय एसएमएमयु व युएलबी स्तरावरील सीएमएमयु, ह्या घटकाखालील कार्यकृतींवर/उद्दिष्टांवर जवळून देखरेख ठेवतील आणि त्याबाबतचे अहवाल व मूल्यमापन पाठवतील. एसयुएलएम आणि युएलबी/कार्यकारी एजन्सी, मिशन डायरेक्टरेट द्वारा वेळोवेळी

विहित केलेल्या नमुन्यांमध्ये वेळेवर अहवाल सादर करतील. त्यात मासिक धर्तीवरील आणि तिमाहीच्या अखेरीस झालेली संचयित कामगिरी तसेच अंमलबजावणी करण्यामधील महत्वाचे प्रश्न समाविष्ट असावेत.

(16.2) डीएवाय-एनयुएलएमखालील उद्दिष्टांची, प्रत्यक्ष केलेल्या कामगिरीबाबतच्या प्रगतीवर देखरेख करण्यासाठी, बँकांना सांगण्यात येते की त्यांनी सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये (जोडपत्र 3 व 4) तिमाही धर्तीवरील संचयित प्रगती अहवाल, संचालक युपीए ह्यांच्याकडे dupa-mhupa@nic.in वर पाठवावेत आणि त्याचप्रमाणे क्युपीआरची सॉफ्ट कॉपी, damodarmishranulm@gmail.com ह्यांना आणि ई-मेलने आरबीआयकडे, उशीरात उशीरा संबंधित तिमाहीच्या पुढील महिन्याच्या अखेरपर्यंत पाठवावा.

(16.3) ह्याशिवाय, डीएवाय-एनयुएलएम खालील उद्दिष्टे व कामगिरी ह्यांचा मागोवा घेण्यासाठी, एक बळकट आयटी-युक्त डीएवाय-एनयुएलएम स्थापन करावे. राज्ये व युएलबी ह्यांनी त्यांचे प्रगती अहवाल ऑनलाईन पाठविणे आवश्यक आहे आणि त्यांनी ह्या साधनाचा उपयोग प्रत्यक्षात केलेल्या कामगिरीवर देखरेख ठेवण्यासाठीही करावा. डीएवाय-एनयुएलएम खालील माहितीचे सक्रिय प्रकटीकरण व पारदर्शकता ह्यासाठी, एसईपी खालील महत्वाचे अहवाल देखील नियतकालिकतेने सार्वजनिक केले जावेत.

**<u>जोडपत्र 1</u>**

## <u>दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम) खालील व्याज सबसिडीचे दावे</u>

**(1) <u>बँकेचे नाव :</u>**

**------------------------------ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी, एसईपी-आय, एसईपी-जी व एसएचजी ह्यांना दरसाल 7% दराने कर्ज देण्यासाठी/बाबत व्याज-सबसिडीच्या दाव्यांचे सादरीकरण (अंक रुपयांमध्ये)**

खाली दिलेल्या एकूण ---- खात्यांना, दिलेल्या वित्तीय सहाय्याबाबत, आम्ही रु.----------------------------------- (रुपये ---------------------------------------------) एवढ्या रकमेची व्याज-सबसिडी मंजुर करुन ती प्रदान करण्याची विनंती करतो.

(अ) एसईपी-आय (व्यक्तीगत उद्योग)

| क्र | शाखा | कर्जदाराचे नाव | कर्ज खाते क्र. | कर्ज रक्कम (रु.) | | व्याज (रु) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मंजुर केलेली | वाटप केलेली | आकारलेली | सबसिडी-दाव्याची रक्कम |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| | एकूण | | | | | | |

(ब) एसईपी-जी (गट-उद्योग)

| क्र | शाखा | गटाचे नाव | कर्ज खाते क्र. | कर्ज रक्कम (रु.) | | व्याज (रु) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मंजुर केलेली | वाटप केलेली | आकारलेली | सबसिडी-दाव्याची रक्कम |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| | एकूण | | | | | | |

(क) स्वयंसेवी गट (एसएचजी बँक जोडणी)

| क्र | शाखा | एसएचजीचे नाव | कर्ज खाते क्र. | कर्ज रक्कम (रु.) | | व्याज (रु) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मंजुर केलेली | वाटप केलेली | आकारलेली | सबसिडी-दाव्याची रक्कम |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| | एकूण | | | | | | |

स्थळ :

(बँकेच्या प्राधिकृत अधिका-याची सही)

तारीख व बँकेचे सील

**जोडपत्र 2**

## --- रोजी संपलेल्या तिमाहीसाठी डीएवाय-एनयुएलएमखाली, महिला स्वयंसेवी गटांचा (डब्ल्युएसएचजी) दरसाल 3% दराने कर्ज देण्यासाठी, अतिरिक्त व्याज सहाय्याबाबतच्या दाव्यांचे सादरीकरण :

**बँकेचे नाव :**

तिमाही दाव्यांसाठीचे विवरणपत्र वाटप केलेली/थकित कर्जे (अंक रुपयांमध्ये)

| क्र | शाखा | डब्ल्युएसएचजीचे नाव | कर्ज खाते क्र. | वाटप केलेली कर्ज रक्कम (रु.) | व्याज-सहाय्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| | एकूण | | | | |

आम्ही येथे प्रमाणित करतो की, वरील कर्जे वेळेवारी फेडण्यात आली असून, अतिरिक्त व्याज सहाय्याचा लाभ डब्ल्युएसएचजी खात्यांना देण्यात आला आहे आणि त्वरित प्रदान करणा-या डब्ल्युएसएचजींसाठी परिणामकारम व्याजदर 4% कमी करण्यात आला आहे.

स्थळ :

(बँकेच्या प्राधिकृत अधिका-याची सही)

तारीख व बँकेचे सील

**<u>जोडपत्र-3</u>**

**दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान खाली (डीएवाय-एनयुएलएम) उद्दिष्ट दर्शविणारे विवरणपत्र**

बॅंकेचे नाव :

(उद्दिष्ट दिल्यावर एकदाच सादर करावयाचे)

अहवालाचे वर्ष :

संख्या प्रत्यक्षातील व रक्कम रु. लाख मध्ये

| **अनुक्र.** | **राज्ये/युटी** | **व्यक्तिगतसाठी उद्दिष्ट (एसईपी-आय)** | | **गटांसाठी उद्दिष्ट (एसईपी-जी)** | | | **एसएचजी बॅंक जोडणीसाठी उद्दिष्ट** | | | **एकूण (उद्दिष्ट)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | गटांची संख्या | लाभार्थींची संख्या | रक्कम | एसएचजीची संख्या | लाभार्थींची संख्या | रक्कम | एकूण संख्या | एकूण रक्कम |
| 1 | अंदमान-निकोबार | | | | | | | | | 0 | 0 |
| 2 | आंध्र प्रदेश | | | | | | | | | 0 | 0 |
| 3 | अरुणाचल प्रदेश | | | | | | | | | 0 | 0 |
| 4 | आसाम | | | | | | | | | 0 | 0 |
| 5 | बिहार | | | | | | | | | 0 | 0 |
| 6 | चंदीगड | | | | | | | | | 0 | 0 |
| 7 | छत्तीसगड | | | | | | | | | 0 | 0 |
| 8 | दादरा आणि नगर हवेली | | | | | | | | | 0 | 0 |
| 9 | दमण आणि दीव | | | | | | | | | 0 | 0 |
| 10 | दिल्ली | | | | | | | | | 0 | 0 |
| 11 | गोवा | | | | | | | | | 0 | 0 |
| 12 | गुजरात | | | | | | | | | 0 | 0 |
| 13 | हरियाणा | | | | | | | | | 0 | 0 |
| 14 | हिमाचल प्रदेश | | | | | | | | | 0 | 0 |
| 15 | जम्मू-काश्मीर | | | | | | | | | 0 | 0 |
| 16 | झारखंड | | | | | | | | | 0 | 0 |
| 17 | कर्नाटक | | | | | | | | | 0 | 0 |
| 18 | केरळ | | | | | | | | | 0 | 0 |
| 19 | लक्षद्वीप | | | | | | | | | 0 | 0 |
| 20 | मध्य प्रदेश | | | | | | | | | 0 | 0 |
| 21 | महाराष्ट्र | | | | | | | | | 0 | 0 |
| 22 | मणिपूर | | | | | | | | | 0 | 0 |
| 23 | मेघालय | | | | | | | | | 0 | 0 |
| 24 | मिझोराम | | | | | | | | | 0 | 0 |
| 25 | नागालॅंड | | | | | | | | | 0 | 0 |
| 26 | ओरिसा | | | | | | | | | 0 | 0 |
| 27 | पुडुचेरी | | | | | | | | | 0 | 0 |
| 28 | पंजाब | | | | | | | | | 0 | 0 |
| 29 | राजस्थान | | | | | | | | | 0 | 0 |
| 30 | सिक्कीम | | | | | | | | | 0 | 0 |
| 31 | तामिळनाडू | | | | | | | | | 0 | 0 |
| 32 | तेलंगणा | | | | | | | | | 0 | 0 |
| 33 | त्रिपुरा | | | | | | | | | 0 | 0 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 34 | उत्तराखंड | | | | | | | | | 0 | 0 |
| 35 | उत्तर प्रदेश | | | | | | | | | 0 | 0 |
| 36 | पश्चिम बंगाल | | | | | | | | | 0 | 0 |
| **एकूण बेरीज** | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**<u>जोडपत्र-4</u>**

**दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डीएवाय-एनयुएलएम) खालील संचयित प्रगती दर्शविणारे तिमाही विवरणपत्र**

बँकेचे नाव,

अहवालाचे वर्ष

अहवालाची तिमाही.

प्रत्यक्ष असलेली खात्यांची संख्या व रक्कम रुपयांमध्ये

| अनुक्र. | राज्ये/युटी | व्यक्तींना दिलेले कर्ज (एसईपी-आय) | | गटांना दिलेले कर्ज (एसईपी-जी) | | | एसएचजी-बँक जोडणी खाली वाटप केलेले एकूण कर्ज | | | एसएचजीमधील महिला एसएचजींना वाटप केलेले कर्ज | | | कामगिरी | | डीएवाय-एनयुएलएमखाली दिलेली एकूण सबसिडी (एसईपी-आय अ एसईपी-जी अ एसएचजी) | डब्ल्यु एसएचजींना दिलेली अतिरिक्त सबसिडी | प्रत्यक्षातील व्याप्ती (संख्येमध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | गटांची संख्या | लाभार्थींची संख्या | रक्कम | एसएचजीची संख्या | लाभार्थींची संख्या | रक्कम | डब्ल्युएसएचजींची संख्या | लाभार्थींची संख्या | रक्कम | डीएवाय-एनयुएलएमखालील एकूण लाभार्थींची संख्या | डीएवाय-एनयुएलएमखाली वाटप केलेली एकूण रक्कम | | | स्त्रिया | एससी/एसटी | विभेदक तेने सक्षम | अल्पसंख्याक |
| 1 | अंदमान-निकोबार | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 2 | आंध्र प्रदेश | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 3 | अरुणाचल प्रदेश | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 4 | आसाम | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 5 | बिहार | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 6 | चंदीगड | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 7 | छत्तीसगड | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 8 | दादरा आणि नगर हवेली | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 9 | दमण आणि दीव | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 10 | दिल्ली | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 11 | गोवा | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 12 | गुजरात | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 13 | हरियाणा | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 14 | हिमाचल प्रदेश | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 15 | जम्मू-काश्मीर | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 16 | झारखंड | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 17 | कर्नाटक | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 18 | केरळ | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 19 | लक्षद्वीप | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 20 | मध्य प्रदेश | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 21 | महाराष्ट्र | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 22 | मणिपूर | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | मेघालय | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 24 | मिझोराम | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 25 | नागालँड | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 26 | ओरिसा | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 27 | पुडुचेरी | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 28 | पंजाब | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 29 | राजस्थान | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 30 | सिक्कीम | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 31 | तामिळनाडू | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 32 | तेलंगणा | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 33 | त्रिपुरा | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 34 | उत्तराखंड | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 35 | उत्तर प्रदेश | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| 36 | पश्चिम बंगाल | | | | | | | | | | | | 0 | 0 | | | | | | |
| **एकूण बेरीज** | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**परिशिष्ट**

| क्र | परिपत्रक क्र. | तारीख | तपशील |
|---|---|---|---|
| 1. | आरपीसीडी.जीएसएसडी.सीओ.बीसी. क्र.26/09.16.03/2014-15 | 14.08.2014 | एसजीएसआरवाय ची, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (एनयुएलएम) म्हणून पुनर्रचना करणे. |
| 2. | एफआयडीडी. जीएसएसडी.सीओ.बीसी. क्र.57/09.16.003/2014-15 | 28.05.2015 | राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (एनयु एलएम) - अहवालाचा नमुना |
| 3. | एफआयडीडी. जीएसएसडी.सीओ.बीसी. क्र.22/09.16.03/2015-16 | 07.04.2016 | दीनदयाळ अंत्योदय योजना (डीएवाय) - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान |